# Regional Marathi Text Bulletin, Chatrapati Sambhajinagar

## Date: 04 April 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०४ एप्रिल २०२४ दुपारी १.०० वा.

****

अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांचं जात प्रमाणपत्र वैध असल्याचा निकाल आज सर्वोच्च न्यायालयानं दिला. सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालानं नवनीत राणा यांचा खासदारकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नवनीत राणा या अमरावतीमध्ये भाजपच्या उमेदवार आहेत. थोड्याच वेळात त्या आपला उमेदवारी अर्ज दाखल करतील. याआधी उच्च न्यायालयानं नवनीत राणा यांचं जात प्रमाणपत्र अवैध असल्याचा निकाल दिला होता. त्याविरोधात राणा यांना सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

****

गेल्या काही दिवसांपासून पक्षात होत असलेल्या निर्णयांशी सहमत नसल्याने काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वासह सर्व पदांचा राजीनामा देत असल्याचं सांगत काँग्रेसचे प्रवक्ता गौरव वल्लभ यांनी आज काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली. पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांना पत्र लिहून त्यांनी आपल्या मनातील खदखद व्यक्त केली. पक्षाच्या चुकीच्या आर्थिक धोरणांचे समर्थन करू शकत नाही. तळागळाशी असलेला पक्षाचा संबंध पूर्णपणे तुटलेला आहे. या विषयावर मला खूप काही बोलायचे आहे. परंतु, इतरांना दुखावण्याचा मानस नसल्यामुळे आपण गप्प आहोत. तरी सत्य लपवणे अयोग्य असल्यामुळे पत्राद्वारे आपली कैफियत मांडत असल्याचं सांगत त्यांनी आपण पक्ष सोडण्याचा निर्णय घेत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज मुंबईत आय आय टी बॉम्बे इथे कर्करोगावरील सी ए आर टी सेल उपचार पद्धतीचं लोकार्पण करत आहेत. कर्करोगावरील इलाजासाठी उपयुक्त असणारी ही उपचार पद्धती बॉम्बे इन्क्युबेटेड कंपनीद्वारे विकसित करण्यात आली

असून या उपचारपद्धतीला आय आय टी बॉम्बे आणि टाटा मेमोरियल सेंटरच्या एकत्रित प्रयत्नाच्या स्वरुपात विकसित करण्यात आलं आहे.

****

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी आज लोकसभा निवडणुकीतील भाजपच्या प्रचाराला बिहारमधून सुरुवात करणार आहेत. पंतप्रधान मोदी यांची बिहारमधल्या जमुई जिल्ह्याच्या बल्लोपूरमध्ये जाहीर सभा होणार आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी एनडीएच्या जागावाटपाच्या घोषणेनंतर बिहारमधली पंतप्रधानांची ही पहिली जाहीर सभा आहे. यावेळी एनडीएच्या बिहारमधील घटक पक्षांचे नेतेही उपस्थित राहणार आहेत. बिहारच्या जमुईसह बिहारच्या औरंगाबाद, गया आणि नवादा लोकसभा क्षेत्रात, पहिल्या टप्प्यात येत्या १९ तारखेला मतदान होणार आहे.

****

औषधांच्या किमतींमध्ये उल्लेखनीय वाढ झाली असल्याच्या वृत्तांचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं खंडन केलं आहे. हे वृत्त चुकीचं आणि निराधार असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे. औषधांच्या किमती वाढल्या असल्याबाबतच्या अहवालांमध्ये ५०० हून अधिक औषधांच्या किमती वाढल्याचं म्हटलं आहे. मात्र, असे अहवाल आणि असे वृत्त पूर्णपणे खोटे, भ्रामक आणि हेतुपुरस्सर असल्याचं आरोग्य मंत्रालयानं नमूद केलं आहे. ७८२ औषधांसाठी सद्यस्थितीत कमाल दरांमध्ये कोणताही बदल करण्यात आला नसून ५४ औषधींच्या किमतीत केवळ एक पैसा इतकी वाढ करण्यात आली असल्याचं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

****

येत्या ४ दिवसात देशाच्या पूर्व भागात उष्णतेची लाट येण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. उत्तरी कर्नाटक, ओडिशा, पश्चिम बंगाल, झारखंड, तेलंगणा तसंच आंध्रप्रदेशमध्ये समुद्र तटांवर या कालावधीत उष्णतेच्या लाटेचा प्रभाव राहण्याची शक्यता आहे. येत्या ३ दिवसात, पूर्वेकडच्या अनेक भागातल्या तापमानात २ ते ३ डिग्री सेल्सियसची वाढ होण्याची शक्यता आहे. या उष्णतेच्या लाटेचा परिणाम देशाच्या अन्य भागातही जाणवू शकेल.

दुसरीकडे, देशाच्या पूर्वोत्तर भागात रविवारपर्यंत काही ठिकाणी वादळ तसंच पावसाची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

***

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये गुजरात

टायटन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात सायंकाळी साडेसात वाजता सामना होणार आहे. काल या स्पर्धेत कोलकाता नाइट राइडर्सने दिल्ली कैपिटल्सचा १०६ धावांनी पराभव केला. कोलकाता नाईट रायटर्र्सने निर्धारित २० षटकांत ७ बाद २७२ अशी धावसंख्या उभारत विक्रमी कामगिरी केली. या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सचा संघ १७ षटकात १६६ धावांवर सर्वबाद झाला.

****